# रा.भा.शिर्के प्रशाला,रत्नागिरी
# वार्षिक अहवाल २०१३-१४

**१. इयत्ता १० वी March २०१३Result - २६५- ९८.१४% (प्रविष्ठ-२७०, उत्तीर्ण - २६५ )**

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नांव | गुण | टक्के |
|---|---|---|---|
| ०१ | कु. मयुरी भरत भुवड | ५३६ | ९७.४५% |
| ०२ | कु. ऐश्वर्या दिपक आंबेरकर | ५३२ | ९६.७३% |
| ०३ | कु. राधा विलास सिनकर | ५३० | ९६.३६% |
| ०४ | कु. चैतन्य श्रीरंग वैदय | ५२९ | ९६.१८% |
| ०५ | कु. उन्नती अनिल झगडे | ५२६ | ९५.६४% |

| | |
|---|---|
| **विशेष प्राविण्य (Dist.)** | **१०८** |
| **प्रथम श्रेणी** | **१०५** |
| **व्दितीय श्रेणी** | **४९** |
| **तृतीय श्रेणी** | **०३** |
| **एकूण** | **२६५** |

**माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा विभाग**

सन २०१२-१३ या सालाकरिता शिष्यवृत्ती परीक्षेला (इ.७ वी ) एकूण ६८ विद्यार्थी बसले होते. उत्तार्ण विद्यार्थी ६३व **निकाल ९२ %** लागला. **२२** विद्यार्थ्याना शिष्यवृत्ती प्राप्त झाली. त्यांची नांवे खालीलप्रमाणे :-

## फेब्रुवारी २०१३ माध्यमिक शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्याची नांवे

| अ.क्र | विद्यार्थ्याचे नांव | क्रमांक | गुण | अ.क्र | विद्यार्थ्याचे नांव | क्रमांक | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | कु. साखळकर तेजस दत्तात्रय | राज्यात प्रथम, जिल्हात प्रथम | २९०/३०० | १२ | कु. मुकादम नुपुर राजेश | २१ वी | २३८/३०० |
| ०२ | कु.महाले अथर्व आत्माराम | राज्यात ४ था, जिल्हात २ रा | २८४/३०० | १३ | कु. गोसावी सुकन्या सुनिल | २२वी | २३६/३०० |
| ०३ | कु. पाटील मानस मदन | राज्यात ६ वा, जिल्हात ३ रा | २८०/३०० | १४ | कु. बने केतकी संजय | २३ वी | २३४/३०० |
| ०४ | कु. किनरे पूर्वा शिवराम | राज्यात ९ वा, जिल्हात ५ वी | २७४/३०० | १५ | कु. नाईक श्रीपाद अरुण | २५ वा | २३०/३०० |
| ०५ | कु. भालेकर वैष्णवी राजेंद्र | जिल्हात १० वा | २६०/३०० | १६ | कु. यादव श्रुती अरुण | २५ वी | २३०/३०० |
| ०६ | कु. महाबळ वल्लभ उदय | जिल्हात १० वा | २६०/३०० | १७ | कु.बोरकर योजना अनंत | २६ वी | २२८/३०० |
| ०७ | कु. साळवी सिध्देश नंदकुमार | जिल्हात १३ वा | २५४/३०० | १८ | कु.कुंभार शुभम संजय | २६वा | २२८/३०० |
| ०८ | कु. वैदय प्राजक्ता | १४ वी | २५२/३०० | १९ | कु.भिडे मंदार संदीप | २७ वा | २२६/३०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | श्रीरंग | | | | | | |
| ०९ | कु. लिंगायत समिक्षा सचिन | १५ वी | २५०/३०० | २० | कु.मांडवकर शुभम रमेश | २९ वा | २२२/३०० |
| १० | कु. कशाळीकर मंथन नरसिंह | १८ वा | २४४/३०० | २१ | कु.सुतार अपेक्षा अनिल | | /३०० |
| ११ | कु. नाचणकर गुरुप्रसाद सुभाष | १९ वा | २४२/३०० | २२ | कु.शंकेश्वरी मोहक मारुती | | २३८/३०० |

माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी प्रशालेतील श्री.शेलार सर,साखळकर मॅडम,श्री.पडवेकर सर, सौ.अभ्यंकर मॅडम,सौ.बागवे मॅडम,सौ.कांबळे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

**महाराष्ट्र ज्ञानपीठ ( गणित )**

मराठा मंदिरतर्फे **महाराष्ट्र ज्ञानपीठ गणित परीक्षा** मार्च २०१३ मध्ये घेण्यांत आली.या परीक्षेसाठी इ.५वी ते ७वी मधील विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांचा निकाल पुढीलप्रमाणे -

**इ. ५ वी प्रविष्ठ - १७ निकाल - १००%**

१. कु. कानिटकर अर्थव वैभव ९७/१०० प्रथम
२. कु. घाणेकर पूर्वा किरण ८६/१०० व्दितीय
३. कु. कर्वे करण केरबा ७५/१०० तृतीय

**इ. ६ वी प्रविष्ठ -३६ उत्तीर्ण - ३४ निकाल - ९४.४४%**

१. कु. रायरीकर श्रीरंग दत्तात्रय ९५/१०० प्रथम
कु. राऊत ऋतुजा शैलेश ९५/१०० प्रथम
२. कु. गोडबोले गौरांग निलेश ९३/१०० व्दितीय
३. कु. पाथरे ईशानी रमाकांत ९२/१०० तृतीय

**इ. ७ वी प्रविष्ठ -३१ उत्तीर्ण - २७ निकाल - ९६.४३%**

१. कु. साखळकर तेजस दत्तात्रय ९९/१०० प्रथम
२.कु. डांगे गिरीश राजेंद्र ९८/१०० द्वितीय
३.कु. भालेकर वैष्णवी राजेंद्र ९७/१०० तृतीय

इ. ५ वी साठी सौ.साखळकर मॅडम , इ.६वी साठी सौ.अभ्यंकर मॅडम तर इ.७वी साठी श्री.शेलार सर यांनी मार्गदर्शन केले.

**हिंदी विभाग**

**महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे २०१३-१४**

१. **राष्ट्रभाषा हिंदी बालबोधिनी परीक्षा - निकाल १००%**

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी - ५३ उत्तीर्ण विद्यार्थी - ५३ विशेष योग्यता प्राप्त ४०

प्रथम क्रमांक - कु.होरंबे स्वरुपा चंद्रकांत ९०/१००
कु.जाधव दिक्षा उदय ९०/१००
व्दितीय क्रमांक - कु.खेडेकर संस्कृती अनंत ८९/१००
कु.राजेशिर्के श्रध्दा नरेंद्र ८९/१००
तृतीय क्रमांक - कु.शिंदे सायली प्रमो ८८/१००
कु.खारगे सहर्षा श्रीकांत ८८/१००
कु.कळेकर मुस्कान दिलनवाज ८८/१००

या परीक्षेकरिता सौ. कांबळे एस.के. मॅडम नी मार्गदर्शन केले.

२. **राष्ट्रभाषा हिंदी प्राथमिक परीक्षा** - ६ वी

प्रथम क्रमांक -कु.पूजा प्रताप जाधव ६०/१००

व्दितीय क्रमांक -कु.पवार वैष्णवी संदिप ५७/१००

तृतीय क्रमांक - कु.गोखले गौरांग निलेश ५४/१००

या परीक्षेकरिता श्री.कुवर एस.वाय सरांनी मार्गदर्शन केले.

३. **राष्ट्रभाषा हिंदी प्रवेशिका परीक्षा** -

प्रथम क्रमांक - कु. आकांक्षा उदय कांबळे १४५/२००

व्दितीय क्रमांक - कु.मृणाली विजय शिंदे १३७/२००

तृतीय क्रमांक - कु.प्राची किसन घाणेकर १३३/२००

या परीक्षेकरिता श्री.आयरे एस.वाय.सरांनी मार्गदर्शन केले.

४. **राष्ट्रभाषा सुबोध परीक्षा** -

प्रथम क्रमांक - कु.सुप्रिया जानू कोकरे १२०/२००

कु.अक्षय अशोक कळंबटे १२०/२००

व्दितीय क्रमांक - कु.केतकी विनायक शिवगण ११०/२००

तृतीय क्रमांक - कु.अरबाज अलीम कासूद १०२/२००

या परीक्षेकरिता सौ.डोईफोडे मॅडमनी मार्गदर्शन केले.

**संस्कृत विभाग अहवाल**

सन २०१२-१३ शालान्त परीक्षेत संस्कृत संयुक्त/संपूर्ण या विषयाचा निकाल १००% लागला. विषयाचा दरवर्षीप्रमाणे प्रशालेत संस्कृत दिन मोठया उत्साहात साजरा केला गेला.प्रतिवर्षाप्रमाणे संस्कृत हस्ताक्षर स्पर्धा, संस्कृत शुध्दलेखन स्पर्धा भगवद्गीता पाइांतर स्पर्धा यांचे नियोजन करण्यात आले आहे.तसेच प्रतिवर्षाप्रमाणे संस्कृत दिन आणि रक्षाबंधन असा एकत्रित कार्यक्रम झाला यावेळी विद्यार्थ्यानी कथा,संस्कृत नाटिका, समूहगीत, समूहनृत्य इ. कार्यक्रम सादर केले.दरवर्षीप्रमाणे प्रशालेतील संस्कृत विभागातर्फे मराठा मंदिर महाराष्ट्र ज्ञानपीठ संस्कृत बाहयपरीक्षा घेण्यांत आल्या. पाठांतरइ.५वी,प्रथमा परीक्षा इ.६ वी, व्दितीया ८ वी पाठांतर आणि प्रथमा परीक्षेला सौ.अभ्यंकर अनया यांनी तर व्दितीया परीक्षेसाठी सौ.काजरेकर यांनी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमासाठी सौ.स्नेहा दुदगीकर आणि सौ.संध्या सप्रे यांनी मोलाचे सहकार्य केले.

**कोकण प्रज्ञा शोध परीक्षा**

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये घेण्यात येणा-या के.टी.एस(कोकण प्रज्ञा शोध परीक्षा)परीक्षेसाठी इ.८ वी ९ वी तील एकूण २१६ विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत.सदर परीक्षेसाठी विद्याथ्यौना पुरक मागदर्शन मिळावे यासाठी एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.सदर कार्यशाळेसाठी गो.जो.महाविद्यालयातील प्राध्यापकानी अनुक्रमे मानसिक क्षमता कसोटी ,शालेय प्रवणता कसोटी व सामान्यज्ञान या विषयाचे मागदर्शन केले.रविवार दि.२९/१२/१३ रोजी कोकण प्रज्ञा शोध परीक्षा आयोजीत करण्यात आली .सदर विभागाचेकाम श्री.आर.वाय.कांबळे,श्री.ढोले,श्री.गद्रे,व श्री बिरादार सर पहातात.

**गणित छंद मंडळ**

सकाळ सत्रात इ.५वी ते ७ वी च्या वर्गातील गणिताची विशेष आवड असणाया विद्यार्थ्याचे गणित छंद मंडळ स्थापन करण्यांत आले.त्यामधून कार्यकारिणी ची निवड करण्यांत आली.या मंडळाच्या सभेला मा.मुख्याध्यापकांनी मोलाचे मार्गदर्शन केले. मुलांनी सुचविलेल्या विविध स्पर्धांमधून इ. ५वी व ६ वी साठी पाढे पाठांतर तर इ. ७वी साठी प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्याचे ठरले. त्यानुसार इ. ५वी ,६वी ची पाढे पाठांतर स्पर्धा

दोन स्तरांवर घेण्यांत आली. प्रथम वर्गवार स्पर्धा घेऊन प्रथम तीन क्रमांकाचे विद्यार्थी पुढील स्पर्धेसाठी पात्र ठरले.शालेय स्पर्धेमध्ये प्रथम पाढे सलग नंतर मधून अशा पध्दतीने पाढे पाठांतर स्पर्धा घेऊन प्रथम तीन क्रमांक काढण्यांत आले व दोन विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ क्रमांक मिळाला.

प्रथम क्रमांक कु. स्वरुपा होरंबे ६ वी ब
व्दितीय क्रमांक कु. निलम सावंत ५ वी अ
तृतीय क्रमांक कु.कोमल जोशी ५ वी क
उत्तेजनार्थ कु. तुषार पडये ५ वी ब
कु. विश्ववेद केळकर ५ वी क

**विज्ञान छंद मंडळ**

सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षामध्ये विज्ञान छंद मंडळामार्फत सभा आयोजन व विविध उपक्रम घेण्यांत आले. या उपक्रमाच्या नियोजनाप्रमाणे काही उपक्रमांची नांवे पुढीलप्रमाणे - १.शास्त्रज्ञांच्या जयंत्या व पुण्यतिथि २. निबंध व वक्तृत्व स्पर्धा ३.भित्तिपत्रके ,विज्ञान हस्तलिखित ४. विज्ञान बाग तयार करणे ५. विद्यार्थीनी वैयक्तिक स्वच्छता व आरोग्य या विषयावर चर्चेसाठी सौ.प्रिती जाधव यांना निमंत्रित करण्यांत आले. ६. विज्ञान वार्ता फलक ७. विज्ञान दिनानिमित्त इ.५वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांचे ०२ दिवस विज्ञान प्रदर्शन आयोजन. विज्ञान दिनी विविध विज्ञान स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्याचा बक्षिस समारंभ आयोजन श्री. विलासजी पाटणे यांच्या हस्ते. ८. विज्ञान सहल इ. उपक्रम राबविले गेले. या मंडळाचे प्रमुख सकाळ सत्र सौ.कांबळे एस.के. तर दुपार सत्र श्रीम. दिवेकर मॅडम हया आहेत.

**विकास हस्तलिखित**

प्रतिवर्षाप्रमाणे सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे विकास हस्तलिखिताचे प्रकाशन होते. या हस्तलिखितामध्ये विद्यार्थी स्वलिखित लेखन साहित्य व चित्रे यांचा समावेश असतो. विद्यार्थ्यांना लिहिते करणे व आत्मविश्वास वाढवणे हा या हस्तलिखिताचा उद्देश आहे. विकास हस्तलिखिताचे सकाळ सत्रात सौ.कांबळे एस.के.,सौ.अभ्यंकर ए.एन.,श्री.कुंवर एस.वाय. व दुपार सत्रात श्रीम.जोशी मॅडम काम पाहतात.

**गणित बाहयपरीक्षा**

रत्नागिरी जिल्हा गणित अध्यापक मंडळामार्फत इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यासाठी गणित प्राविण्य आणि संबोध परीक्षा घेण्यांत आली होती.इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्याचा समावेश करण्यांत आला होता.

**गणित संबोध परीक्षा** -इ.५वी - प्रविष्ठ विद्यार्थी- ६८उत्तीर्ण विद्यार्थी -६८
- इ.८ वी - प्रविष्ठ विद्यार्थी - १२ उत्तीर्ण विद्यार्थी - १२

**गणित प्राविण्य परीक्षा**-इ.५वी - प्रविष्ठ विद्यार्थी - २२
- इ.८वी - प्रविष्ठ विद्यार्थी - ०९

**इतिहास प्रज्ञा शोध परीक्षा**

सन २०१२ या शैक्षणिक वर्षाकरिता इ.५ वी तून १८ तर ८ वी ८२ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते त्यापैकी ५ वी मध्ये १२ तर ८ वीमध्ये ३७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले सन २०१३ च्या डिसेंबर मध्ये झालेल्या परीक्षेसाठी इ.५वीचे २० तर ८ वीचे ४७व इ.१० वी मधून २विदयार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाले आहेत.

**वाचू आंनदे अभियान**

आपल्या संस्थेचे विद्यमान कार्याध्यक्ष मा.ॲड.विलासजी पाटणे यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनातून वाचू आनंदे वाचन संस्कृती रुजविणारे अभियान सुरु झाले.प्रशालेंत दि.१४ ऑगस्ट २०१३ रोजी सुप्रसिध्द कवी दादा मडकईकर यांचे काव्यगायनाचाकार्यक्रम अतिशय चांगल्याप्रकारे संपन्न झाला. या कार्यक्रमाचे नियोजन श्री.देवळेकर ,श्री.माळगेसर यांनी मा.मुख्याध्यापक ,उपमुख्याण्यापक व पर्यवेक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते.

**कला विभाग**

**महाराष्ट्र शासनाची बाल चित्रकला स्पर्धा -** सहभागी विद्यार्थी २२५

**शासकीय रेखा व रंगकला परीक्षा (चित्रकला ग्रेड परीक्षा एलिमेंटरी /इंटरमिजिएट)**
**चित्रकला ग्रेड परीक्षा सप्टेंबर - २०१३**प्रविष्ठ विद्यार्थी - १०६
**एलिमेंटरी चित्रकला ग्रेड परीक्षा** -सहभागी विद्यार्थी - ६४
**इंटरमिजिएट चित्रकला ग्रेड परीक्षा** -सहभागी विद्यार्थी - ४२
**रत्नागिरी जिल्हा कलाध्यापक संघ आयोजित चित्रकला स्पर्धा** - सहभागी विद्यार्थी- २०५
**भारतीय पर्यावरण शास्त्र व तंत्रज्ञान संस्था,रत्नागिरी आयोजित पर्यावरण विषयावर चित्रकला स्पर्धा**
सहभागी विद्यार्थी - ४०
**ॲक्सिस बँक शाखा,रत्नागिरी आयोजित चित्रकला स्पर्धा** - सहभागी विद्यार्थी - २०
**गीतामंडळ आयोजित चित्रकला व रंगावली स्पर्धा**
**चित्रकला स्पर्धा** - सहभागी विद्यार्थी - २५
**रंगावली स्पर्धा** - सहभागी विद्यार्थी - ०५
**मायफ्रेंड गणेशा अर्थात गणेशमुर्ती बनविण्याची स्पर्धा -संयोजक -आर्ट सर्कल,रत्नागिरी**-सहभागी विद्यार्थी - १०
**पूर्व माध्यमिक विभाग गट** - सहभागी विद्यार्थी - ०५
**माध्यमिक विभाग गट** - सहभागी विद्यार्थी - ०५
**भारतीय डाक (खाते)विभाग ,रत्नागिरी आयोजित चित्रकला स्पर्धा** - सहभागी विद्यार्थी -३०

**शारीरिक शिक्षण विभाग**

सन २०१३-१४या शेक्षणिक वर्षात प्रशालेचे खो-खो,बास्केटबॉल,थ्रोबॉल,बॅडमिंटन,ॲथलॅटिक्स,बुध्दीबळ,कॅरम, फुटबॉल,तायक्वांदो ,कुस्ती इ.स्पर्धामध्ये प्रशालेचे विद्यार्थी खाजगी व शासकीय स्पर्धांमध्ये सहभागी होऊन उज्वल यश संपादन केले आहे.

१. प्रशालेचा १७ वर्षाखालील बास्केटबॉल संघ - जिल्हा विजयी
२. थ्रोबॉल संघ - १७ मुली - जिल्हा विजयी
३. खो-खो संघ - १४,१७ वर्षाखालील - जिल्हा विजयी
४. ॲथलॅटिक्स - १४,१७ वर्षाखालील मुली - जिल्हा विजयी
५. बुध्दीबळ संघाची राज्यस्तरावर निवड ( ०४ खेळाडू )

**या शैक्षणिक वर्षातील खो-खो संघाची राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी झाला.**

**सन २०१३-१४ चे राष्ट्रीय खेळाडू**

१. कु. हर्षल विजय आखाडे- थ्रोबॉल
२. कु. प्रथमेश राजकुमार नाचणकर -क्रिकेट
३. कु.दिव्या संजय भोरे -३००० मी. व १५०० मी. धावणे
४. कु. ऐश्वर्या यशवंत सावंत -खो-खो
५. कु. अपेक्षा अनिल सुतार - खो-खो
६. कु. श्रध्दा वासुदेव लाड - खो - खो
७. कु.माधवी रामदास बोरसुदकर - खो-खो
८. कु.प्रियांका सुनिल चव्हाण - तायक्वाँदो
९. कु. पूर्वा शिवराम किनरे - योगा ( दोन राष्ट्रीय स्पर्धा)
१०. कु. प्राप्ती शिवराम किनरे - योगा

**कु. पूर्वा शिवराम किनरे** हिने **फ्रान्स(पॅरीस)** येथे झालेल्या **योगा स्पर्धेत** सहभागी झाली. या स्पर्धेत एकूण ११ देशांचे खेळाडू सहभागी झाले होते.या स्पर्धेत कु.पूर्वा किनरे हिने**१. वैयक्तिक आसने - सिल्व्हर मेडल २. आर्टस्टिक पेअर - सिल्व्हर मेडल ३. रिदमिक पेअर - सिल्व्हर मेडल** अशी पदके मिळविली.
**रांची (झारखंड)** येथे स्पर्धेत पुन्हा **साऊथ कोरीया व मलेशिया** येथे होणाया **आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड** झाली आहे. रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीने कु.पूर्वा किनरे हिचा भव्य स्तरावर केला व तिची शोभायात्रा काढून तिचे

कौतुक केले. सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात विविध खेळातून जवळ-जवळ ४० विद्यार्थी राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी झाले. तसेच एकूण १० खेळाडू राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाले.

**आदर्श खेळाडू** म्हणून **कु. ऐश्वर्या यशवंत सावंत , कु. प्रथमेश राजकुमार नाचणकर** यांची निवड करण्यांत आली.

**दि. २,३ जानेवारी रोजी वार्षिक क्रीडा महोत्सव** घेण्यांत आला. त्यामध्ये विजयी झालेले गट पुढीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| इ.५वी ते ७वी (मुले बॉक्स क्रिकेट) | - इ. ७वी क - विजयी , इ. ६वी क - उपविजयी |
| इ.५वी ते ७वी (मुली) लंगडी | - इ. ७वी क - विजयी , इ. ६वी क - उपविजयी |
| इ.८ वी ते १० वी (मुले) क्रिकेट | - इ. १० वी क - विजयी , इ. १०वी ड - उपविजयी |
| इ.८ वी ते १० वी (मुली) लगोरी | - इ. १० वी इ - विजयी , इ. ९वी इ - उपविजयी |

या स्पर्धांचे नियोजन तसेच मार्गदर्शन सौ. कोबंळे पी.एस. ,श्री.मयेकर व्ही.एस.,श्री.गद्रे आर.व्ही. हया क्रीडा शिक्षकांनी केले.

**स्वराज्य सभा आणि सांस्कृतिक विभाग अहवाल**

स्वराज्य सभा आणि सांस्कृतिक विभाग हे दोन विभाग प्रशालेमध्ये सहशालेय कार्यक्रमाचे आयोजन करतात. सन २०१३-२०१४या वर्षी अत्यंत खेळामेळीच्या वातावरणात स्वराज्य सभा निवडणूक दि.०४/०७/२०१३ रोजीपार पाडल्या.या दिवशी १४७६ विद्यार्थ्यानी मतदान केले.यामध्ये इ.१० वी अ मधील कुमार **प्रथमेश राजकुमार नाचणकर** हा ११८५ मतानी विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून विजयी झाला तर कुमारी **कस्तुरी भास्कर भागवत**हिची ७३६ मते मिळून विद्यार्थीनी प्रतिनिधी म्हणून निवड झाली.दोन्ही G.S.आपले काम मा.मुख्याध्यापक,उपमुख्याध्यापक,पर्यवेक्षक तसेच संबंधित शिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम प्रकारे करत आहेत. याच दिवशी पहील्या तासिकेला सर्वच वर्गातून वर्गशिक्षकांनी वर्गप्रतिनिधिची निवडणूक घेतली.सर्व यशस्वी विद्यार्थ्याचे मा.मुख्याध्यापक श्री.कांबळे सर यांनी अभिनंदन केले.हा निवडणूकीचा कार्यकम यशस्वी पार पाडण्यामध्ये सर्वच पदाधिकारी व शिक्षकवृंद तसेच सेवक वर्गाचे सहकार्य मिळाले.स्वराज्य सभा आणि सांस्कृतिक विभाग यांच्या विदयमाने प्रशालेत गुरुपौर्णिमा ,जागतिक लोकसंख्या विस्फोट दिन,लोकमान्य टिळक पुण्यतिथी,रक्षाबंधन,संस्कृत दिन,क्रांतीदिन,म.गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती,शालेय किशोरावस्था जीवनकौशल्य (इ.६ वी व ७ वी तील विद्यार्थीनीसाठी)कार्यक्रम,सरदार वल्लभभाई पटेल जयंती वमाजी पंतप्रधान श्रीम.इंदिरा गांधी स्मृतिदिन कार्यक्रम घेण्यात आले.सन २०१२/१३ या शैक्षणिक वर्षासाठी स्वराज्य सभेचे काम सौ.कांबळे पा.एस.,सौ.कोळपे एन.व्ही.श्री.बिरादार सर,श्री.जाधव पी.सी.तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ.पवार पी.एस.श्री.आयरे एस.वाय.श्री.चव्हाण एस.पी.काम पहातात.वर्षभरातील सर्व कार्यक्रम प्रशाला प्रमुख मा.मुख्याध्यापक,उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांचा बहूमोल मार्गदर्शनानुसारच यशस्वीपणे पार पाडले जातात.

**परीक्षा विभाग अहवाल**

रा.भा.शिर्के प्रशालेमध्ये परीक्षा विभाग अत्यंत चांगल्या प्रकारे परीक्षेचे नियोजन व संयोजन करीत असतो. इ. ५वी ते १० वी पर्यतच्या विद्यार्थ्याच्या परीक्षा घेण्याचे काम परीक्षा विभाग मा. मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली करीत असतो. इ.५वी ते १० वी च्या विद्यार्थ्याच्या घटक चाचण्या,सत्र १, सत्र २ परीक्षा व इ. १० वीच्या सराव परीक्षा,पूर्व परीक्षा परीक्षा विभागामार्फत घेतल्या जातात. तसेच या कामासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे चांगले सहकार्य मिळते. सकाळ सत्र परीक्षा विभाग प्रमुख श्री.शेलार सर व दुपार सत्रासाठी श्री.चव्हाण आर.बी. सर, श्री.कदम सर काम पाहतात. श्री.दयांनद कांबळे व श्री.वजरेकर हे सेवक यांची मदत मिळते.परीक्षा विभागासाठी मा.मुख्याध्यापकांच्या बरोबर उपमुख्याध्यापक,पर्यवेक्षक यांचेही उत्तम मार्गदर्शन लाभते. त्यामुळे परीक्षा यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी परीक्षा विभाग प्रयत्नशील असतो.

**स्पर्धा विभाग अहवाल**

प्रतिवर्षाप्रमाणे सन २०१३-१४या चालू शै.वर्षातही विविध स्पर्धामध्ये विद्यार्थ्यानी भरघोस यश संपादन केले.

१. **रत्नागिरी नगर परिषद आयोजित लो.टिळक पुण्यतिथी तालुकास्तरीय -गीतापठण स्पर्धा**

१. कु. दामले गुरूप्रसाद मि.- प्रथम क्रमांक
२. कु. साखळकर तेजस द - व्दितीय क्रमांक
३. कु. महाबळ वल्लभ उदय -तृतीय क्रमांक

२. **रत्नागिरी नगर परिषद बालकल्याण विभाग आयोजित काव्यस्पर्धा**

प्रथम क्रमांक :- कु. गायत्री दर्शन देसाई उत्तेजनार्थ :- कु. प्रज्चल विकास तेंडुलकर

३.**गीतामंडळ रत्नागिरी आयोजित**

भक्तीगीत स्पर्धा :- कु.ईशानी मनोज पाटणकर- -प्रथमक्रमांक
सुलेखन स्पर्धा :- १)कु. वनश्री किशोर कांबळे- -द्वितीय क्रमांक
२)कु.अथर्व राजेश नेने -उत्तेजनार्थ
३)वैष्णवी राजेंद्र भालेकर -उत्तेजनार्थ

४. **चाटे स्कूल ऑफ ज्यु.कॉलेज ऑफ सायन्स कोल्हापूर आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा**

प्रथम क्रमांक :- कु. कस्तुरी भास्कर भागवत

५. **निबंध स्पर्धा**

( गट २) प्रथम क्रमांक कु. साध्वी दिपक राजवाडे व्दितीय क्रमांक कु. अथर्व राजेश नेने
तृतीय क्रमांक कु. भूषण प्रमोद वायंगणकर

( गट ३ ) व्दितीय क्रमांक कु. कोमल रमेश रावणंग तृतीय क्रमांक कु. अपूर्वा विद्याधर सरदेसाई

६. **जी.जी.पी.एस. आयोजित संस्थार्गत गीतगायन स्पर्धा**

प्रथम क्रमांक (गट ४)१)ईशानी म. पाटणकर-प्रथम क्रमांक २)वैदय प्राजक्ता श्री.- व्दितीय क्रमांक

७. **सौ.गोदूताई जांभेकर विद्यालय आयोजित संस्थातर्गत पठण स्पर्धा-गट ३-गट-५वी ते ७वी**

१)सुखदा वि .टिकेकर- व्दितीय क्रमांक२)दिशा हे. जोशी-तृतीय क्रमांक३)श्रद्धा न. राजेशिर्के-उत्तेजनार्थ

**गट ३-८वी ते १०वी-१)** )कु. साखळकर तेजस द.- प्रथम क्रमांक २)कु. महाबळ वल्लभ उ.- प्रथम क्रमांक

८. **शांताराम यशवंत गोडबोले माध्यमिक विद्यालय,केळये संस्थातर्गतनिबंध स्पर्धा**

( गट ३) प्रथम क्रमांक-१)कु. सावंत अक्षता आ. २)कु.मजगांवकर सिदधी प्र - तृतीय क्रमांक
( गट ४)कु.मोघे चिन्मय कीरण- तृतीय क्रमांक कु. रेणुका विजय सरदेसाई
( गट ३) कु.पिसे अक्षता पां.- तृतीय क्रमांक (इंग्रजी माध्यम)

९. **सौ.गोदूताई जांभेकर विद्यालय आयोजित संस्थातर्गत नाटयवाचन स्पर्धा-**

**गट-५वी ते ७वी-१)ढवळे शर्वाणी दि.**व्दितीय क्रमांक
**२)कदम गायत्री दि.** तृतीय क्रमांक

**गट-८वी ते १०वी-१)राजवाडे साध्वी दि.**- व्दितीय क्रमांक
**२)वैद्य प्राजक्ता श्री.- तृतीय क्रमांक**

१०. **कै. ल.ग.पटवर्धन प्राथमिक विदयामंदिर, रत्नागिरी आयोजित संस्थांतर्गत वक्तृत्व स्पर्धा**

( गट ३ ) प्रथम क्रमांक कु. प्राजक्ता श्रीरंग वैद्य व्दितीय क्रमांक कु. साध्वी दिपक राजवाडे
तृतीय क्रमांक कु. अथर्व राजेश नेने

( गट ४ ) व्दितीय क्रमांक कु. राहुल मंगेश सरदेशपांडे,तृतीय क्रमांक - कु.नेहा राजेश नेने
उत्तेजनार्थ कु. स्नेहल प्रविण सुर्वे

११.कथाकथन व काव्यवाचन स्पर्धा-१) अथर्व वै.कानिटकर२) कु. अथर्व राजेश नेने३)तेंडुलकर प्रज्वल ४)देसाई गायत्री
(न्यू इंग्लीश स्कूल,पाली)

१२. क-हाड शिक्षण संस्थेचे-यशवंत व्यासपीठ- **वक्तृत्व स्पर्धा-भागवत कस्तुरी भास्कर**--उत्तेजनार्थ (राज्यस्तरीय)

१३. सामाजिक वनीकरण-निबंध स्पर्धा-**१)सावंत सुयश गो.** .- प्रथम क्रमांक २)शिंदेअमिषा सु. .- व्दितीय क्रमांक
३)यादव श्रुती अ.- तृतीय क्रमांक
१४)सामाजिक वनीकरणवक्तृत्वस्पर्धा-१)मोघे चिन्मय किरण.- प्रथम क्रमांक २)शिंदे मृणाली वि. .- प्रथम क्रमांक
(विभाग)३) कु. प्राजक्ता श्रीरंग वैद्य -व्दितीय क्रमांक ४कु. साध्वी दिपक राजवाडे-व्दितीय क्रमांक

**NCC विभाग**

सन २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षात इ.८ वी मधून प्रथम वर्षात २१कॅडेट JD व ०८ कॅडेट JW व इ. ९ वी मधील व्दितीय १३ कॅडेट JD व ०८ कॅडेट JW असे ५० NCC कॅडेटची प्रशिक्षण घेतात.यामध्ये १. कु.अनिकेत वाडकर २.कु.ओंकार हट्टीकर ३. मीरा चव्हाण यांची **पी.ओ.कॅडेट** म्हणून तर १. कु.सुयश जोशी २.कु.प्रणय सिनकर ३. कु.चेतना नाखरेकर ४.कु.तेजस साखळकर ५. कु.श्रीपाद नाईक ६.कु.नैनिका गमरे यांची **लिडिंग कॅडेट** म्हणून निवड झाली आहे.

**NCC** विभाग प्रमुख चीफ ऑफिसर श्री.सी.एस.पाटील यांनी दि.१५ ऑगस्ट २०१३ पासून श्री.गद्रे आर. व्ही.यांच्याकडे जबाबदारी दिली आहे.

**विविध सामाजिक व शालेय उपक्रमातील सहभाग :-**

१.**वृक्षारोपण कार्यक्रम -** मा.कमांडर श्री.एस.डी.सिंग यांच्या हस्ते शालेय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम.
२. **१५ ऑगस्ट : - स्वातंत्र दिन** -ध्वजारोहण कार्यक्रम.
**३. अंमली पदार्थ विरोधी रॅलीत** N.C.C. छात्रांनी सहभाग घेतला.
**४. सागर किनारा स्वच्छता मोहिमेत**N.C.C. छात्रांनी सहभाग घेतला.
**५. NCC Day**दिवशीगोगटे जोगळेकर कॉलेज मैदानावर केलेल्या परेडमध्ये N.C.C. छात्रांनी सहभाग घेतला.
**६. A.T.C.कॅम्प २०१३ मध्ये** घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेत N.C.C. छात्रांनी सहभाग घेतला
**७. A सर्टीफिकेट परीक्षेत** कु. नेहाल पाटील याचा प्रथम क्रमांक प्राप्त केला.

शाळेतील विविध कार्यक्रमात N.C.C.छात्र उत्साहाने सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी करतात.

**महाराष्ट्र छात्र सेना**

आपल्या रा.भा.शिर्के प्रशालेत महाराष्ट्र छात्र सेना हे चालते इ.८ वी ९वी च्या विद्यार्थ्यांना हा विषय ऐच्छिक ठेवण्यात आला आहे यावर्षी सन २०१३-१४ इ.८ वी च्या मुला -मुलीची संख्या ११७ आहे तर इ.९ वी ची संख्या १३९ अशी आहे इ.८ वी व ९ वी ची संख्या एकूण २५६ आहे.

प्रत्येक वर्षाला अनेक उपकम असतात.त्यामध्ये महाराष्ट्र छात्र सेनेचे विद्यार्थी सहभागी होत असतात.

- ❖ स्वामी विवेकानंद शतकोत्तर सुवर्ण महोत्सव शोभा यात्रेमध्ये १०० विद्यार्थी सहभागी झाले होते.
- ❖ जागतिक लोकसंख्या इशारा दिन हा कार्यक्रम शाळेत साजरा झाला.
- ❖ ऑगस्ट क्रांतिदिन रॅलीमध्ये सहभाग.
- ❖ १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन प्रभातफेरीत विद्यार्थी सहभागी.

- ❖ म.गांधी जयंती निमित्त परिसर स्वच्छता सहभाग.
- ❖ क्रीडा भारतीच्या विद्यार्थी संचलन गीत स्पर्धेत - मुलींचा ट्रुप व मुलांचा ट्रुप सहभागी होता.
- ❖ सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ सोहळा सहभाग.(रांगोळी काढणे,स्वागत गीत गाणे व गार्ड ऑफ ऑनर देणे )

**विज्ञान विभाग**

१. **विज्ञान प्रदर्शन** राज्य विज्ञान शिक्षण संस्था,नागपूर यांच्याकडून तालुका,जिल्हा व राज्यस्तरीय प्रदर्शन आयोजित केले जाते. आयोजित केलेल्या प्रदर्शनात प्रशालेने सर्व प्रकारांत घवघवीत यश संपादन केले.

**प्रतिकृती /मॉडेल : पर्यावरण सूचक कूलर**. मॉडेल बनविणारे विद्यार्थी - इ.८वीतील शुभम संजय वर्तक,इ.८वी

१. **तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन** : - तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन दि. २२,२३,२४ डिसेंबर २०१३ रोजी वरवडे,खंडाळा हायस्कूल ता.रत्नागिरी येथे आयोजित केले होते. येथे मॉडेलला तिसरा क्रमांक मिळाला व जिल्हा स्तरासाठी निवड झाली.

२. **जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शन** : -जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शन मूर ता.राजापूर येथे दि.२९,३०,३१ डिसेंबर २०१३ला आयोजित केले होते. कु.शुभम संजय वर्तक याने सहभाग घेतला होता.**मार्गदर्शक श्री.पडवेकर सर**

३. **विज्ञान नाटीका : - पर्यावरण एक नव जीवन**

प्रशालेतील ८ विद्यार्थी सहभागी झाले होते.याला तिसरा क्रमांक मिळाला. यासाठी श्री.आयरे सर, श्री.चव्हाण सर व सौ.अंभ्यकर,सौ.कांबळे यांनी मार्गदर्शन केले.

४. **वक्तृत्वस्पर्धा - विषय :सण आणि पर्यावरण-** या स्पर्धेसाठी इ.८ वी तील विद्यार्थीनी सहभागी झाली होती- कु.साध्वी राजवाडे तालुका विज्ञान प्रदर्शनात या स्पर्धेत दुसरा क्रमांक प्राप्त.

**२.विज्ञान रंजन परीक्षा** : - विज्ञान रंजन परीक्षा रत्नागिरी जिल्हा विज्ञान शिक्षक मंडळ,रत्नागिरी यांच्याकडून आयोजित केली जाते. प्रशालेतील प्राथमिक गटात ६३ व माध्यमिक गटात ७३ विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत. यासाठी श्री.रहाटे सर , श्री.चव्हाण ए.पी. यांचे मार्गदर्शन मिळाले.

**३.डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा : -**

डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेचे आयोजन मुंबई सायन्स टिचर्स असोसिएशन यांच्याकडून केले जाते.इ.६वीतून ११ विद्यार्थी व इ.९वीतून १२ विद्यार्थी सहभागी झाले होते.त्यातील सुयश सावंत,विनित कवळेकर व अनामय बेळेकर हे प्रमाणपत्रधारक म्हणून पात्र ठरले आहेत व पहिला राऊंड प्रॅक्टिकलसाठी यांची निवड झाली आहे.यासाठी श्री.के.डी.कांबळे,श्री.बिरादार सर,सौ.पाटील मॅडम यांनी मार्गदर्शन केले.

**४. IAPT**मार्फत प्रशालेत प्रथमच NSEJS(National State Exam in Jr. Sc.) भाभा परीक्षेचे आयोजन केले गेले होते.सदर परीक्षेला २१ विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत. यासाठी श्री.के.डी.कांबळे सरांचे मार्गदर्शन मिळाले.

**५.विज्ञान छंद मंडळ**

या वर्षीही प्रशालेत विज्ञान मंडळाची स्थापना करण्यांत आली.अनेक सभांचे आयोजन करण्यांत आले.या सभांमध्ये विज्ञान छंद मंडळाच्या वर्षभराच्या अनेक कार्यक्रमांचे नियोजन करण्यांत आले. १. निबंध स्पर्धा २.

वक्तृत्व स्पर्धा ३.विज्ञान सहल ४. शालांतर्गत विज्ञान प्रदर्शन इ दि.२७/०८/१३ रोजी घेण्यांत आलेल्या निबंधस्पर्धेत ३० विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी रेणूका सरदेसाई - १ ला व कु. अनिकेत चव्हाण - २ रा, तर कु.सोनल नाचणकर - ३ रा क्रमांक प्राप्त झाला. यासाठी श्री.के.डी.कांबळे सर व सौ.दिवेकर मॅडम यांनी मार्गदर्शन केले.

दि. ३०/१०/१३ रोजी विज्ञान छंद मंडळ,स्वराज्य सभा व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.होमी भाभा जयंती साजरी करण्यांत आली. सदर कार्यक्रमात सुयश सावंत याने डॉ.होमी भाभा यांचेविषयी माहिती दिली. तसेच प्रमुख वक्ते म्हणून प्रशालेतील विज्ञान विभाग प्रमुख श्री.के.डी.कांबळे यांनी डॉ.होमी भाभा व ISON धूमकेतू या विषयी माहिती दिली. मा.मुख्याध्यापक श्री. एस.एम.कांबळे यांनी अध्यक्षीय भाषण केले.

**६. Science Olympiad Foundation, Delhi : -**

Science Olympiad Foundation यांच्यामार्फत विविध स्पर्धा परीक्षा आयोजित केल्या जातात.यावर्षी २०० विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत. यावर्षी विद्यार्थ्याचा सहभाग खालीलप्रमाणे : -

- ❖International Maths Olympiad : ५th ज्र १३, ६th -१८, ७th -१३, ८th ज्र ०९,९th ज्र १४ Total ज्र ६७
- ❖National Science Olympiad : ५th ज्र १२, ६th -०६, ७th -०७, ८th ज्र १३, ९th ज्र १२ Total ज्र ५०
- ❖ International English Olympiad : ५th ज्र १२, ६th -१२, ७th -१५, ८th ज्र १७,९th ज्र २५ १०th ज्र ०२ Total ज्र ८३

National Science Olympiad या परीक्षेत इ.८वीतील कु.तेजस साखळकर यांने स्कुल रँक-१,स्टेट रँक-६१ व इंटरनॅशनल रँक - १२२ प्राप्त केला व second level exam साठी प्राप्त ठरला आहे. तसेच इ.९वीतील कु.सुयश सावंत यांने स्कुल रँक-१,स्टेट रँक-३६६ व इंटरनॅशनल रँक-६८८ प्राप्त केला व second level exam साठी प्राप्त ठरला आहे. या परीक्षेसाठी श्री.के.डी.कांबळे व सौ.अभ्यंकर मॅडम यांचे मार्गदर्शन मिळाले.

**७. NTS/NMMS** -स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद ,पुणे यांच्यामार्फत केले जाते.सदर NTSपरीक्षेला १५ विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत. तर NMMS परीक्षेला २४ विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत. शै.वर्ष २०१२-१३ मध्ये घेतल्या NTS परीक्षेत चैतन्य वैद्य व NMMS परीक्षेत ओंकार हट्टीकर पात्र ठरले आहेत. NTSपरीक्षेसाठी श्री.के.डी.कांबळे व NMMS परीक्षेसाठी श्री. आर .एन.ढोले. यांनी मार्गदर्शन केले.

**ग्रंथालय विभाग**

प्रशालेमध्ये सुसज्ज ग्रंथालय असून त्यामध्ये सुमारे **१०,५००** पुस्तके आहेत. यामध्ये विविध ग्रंथ,संदर्भग्रंथ,विश्वकोश,चरित्रात्मक,प्रवासवर्णने,क्रीडाविषयक,कविता संग्रह,स्वामी विवेकानंद ग्रंथावली,भगवद्गीता अशा विविध प्रकारांनी भरलेले समृध्द ग्रंथालय आहे. ग्रंथालयामध्ये विविध प्रकारची नियतकालिके शिक्षक व विद्यार्थ्यासाठी आहेत.विद्यार्थी,शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व पालक ग्रंथालयासाठी पुस्तकरुपाने भरघोस देणगी देतात. आनंदाची गोष्ट म्हणजे शै.वर्ष २०१३-१४ मध्ये आतापर्यंत १३,५००/- ची पुस्तके देणगीरुपात प्राप्त झाली आहेत. विद्यार्थ्यांना आठवडयातून दोन वेळा पुस्तके घेता येतात. विद्यार्थी ग्रंथालयाचा लाभ मोठया प्रमाणावर घेतात. जास्तीत जास्त पुस्तके वाचणाया विद्यार्थ्यांना बक्षिसे दिली जातात. ग्रंथालयाकडून चालू वर्षी पासून (२०१३-१४) शिक्षक पुस्तक भिशी हा नवोपक्रम सुरु करण्यांत आला आहे. यातून शिक्षकांनी त्यांच्याच पैशातून विविध प्रकारची पुस्तके खरेदी करुन वाचण्याचा आनंद घेतला.ग्रंथालय विभागाकडून इ.५वी ते ७ वी साठी कथाकथन स्पर्धा घेण्यांत आली.ग्रंथालयाचे काम ग्रंथपाल सौ.चव्हाण मॅडम उत्तम प्रकारे पार पाडत आहेत.

**व्यवसाय मार्गदर्शन**

व्यवसाय मार्गदर्शन विषयाअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम व प्रकल्प कामाचे आयोजन करण्यात येते.वर्ष २०१३-२०१४ साठी इ.१० वी च्या विद्यार्थ्यांसाठी ॲप्टिटयूड टेस्ट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम दि.१७ व १८ सप्टेंबर २०१३ रोजी आयोजित करण्यांत आला. सदर कार्यक्रमासाठी श्री.धोत्रे व श्री.रहाटेया समुपदेशकाना निमंत्रीत करण्यात आले.विविध मानसशास्त्रीय कसोटयांच्या आधारे विद्यार्थ्यांचा बौध्दिक स्तर व कल यांची चाचणी घेतली. तसेच विद्यार्थी व पालक यांचे सामुहिक व वैयक्तिक समुपदेशन करण्यांत आले. सदर कार्यक्रमासाठी प्रशालेतील सुमारे १०० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. तसेच अनुबंध या संस्थेच्या सहयोगातून इ.८वी,९वी,१०वी च्या विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्र भेटी आणि व्याख्यानांचे आयोजन करण्यांत येते. सदर विभागाचे काम श्री.आर.वाय.कांबळे सर पहातात.

**सालसेप ( २०१३-१४)**

**सालसेप विभागातर्फे विद्यार्थिनीसाठी राबविण्यात आलेले उपक्रम**

- ❖ **१ ऑक्टोंबर २०१३ जागतिक रक्तदान दिन**

या दिनांच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना रक्त व रक्तदान या संबंधी सालसेप विभागप्रमुख सौ.पाटील एस्.एन् यांनी सखोल मार्गदर्शन करुन जाणीवजागृती करुन दिली तसेच जागतिक रक्तदान दिन या निमित्ताने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये खालील विद्यार्थीनीनी यश संपादन केले.

१.प्रथम-कु.उत्कर्षा भुते (९ वी अ)        २.द्वितिय-कु.शिवानी महाडीक (९ वी क)

- ❖ शालेय किशोरावस्था जीवन कौशल्य शिक्षण कार्यक्रम (सालसेप) अंतर्गत विद्यार्थिनींकरिता वयात येताना या विषयावर मार्गदर्शन वर्गाच आयोजन करण्यांत आले होते. यासाठी मार्गदर्शक म्हणून प्रॉक्टर ॲण्ड गॅम्बलच्या (DME) सौ.प्रिया जाधव उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थिनींना या वयात होणारे बदल,शारिरीक स्वच्छता याविषयी मार्गदर्शन केले त्याचबरोबर विद्यार्थिनींच्या शंकाचे निरसन केले. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थिनींना पौगंडावस्था संदर्भात LCD वरुन चित्रफितही दाखविण्यांत आली. या मार्गदर्शन वर्गासाठी इ. ६वी व ७ वी च्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या.
- ❖ **११ डिसेंबर २०१३**

महिलांना सक्षम होण्यासाठी विविध कौशल्ये आत्मसात करुन त्यांचा यथायोग्य वापर करणे या गोष्टी आजच्या काळात अत्यावश्यक आहेत. विद्यार्थिनींना याची जाणीव करुन देण्यासाठी जागतिक मुलगी दिवस या कार्यक्रमाचे औचित्य साधून जीवनाचा निकोप दृष्टिकोन विकसित होण्याच्या दृष्टीने जीवन-कौशल्यांची गरज याविषयी मार्गदर्शन सालसेप विभाग प्रमुख सौ.पाटील एस.एन. यांनी केले

**राष्ट्रीय हरितसेना**

दि.१७ जून रोजी राष्ट्रीय हरितसेनांतर्गत फिनोलेक्स कंपनीच्या संयोगाने हरितसेना विभागातील मुलांना १००० रोपांचे वाटप करण्यात आले.एक मूल एक झाड या योजनेअंतर्गत त्याचबरोबर फिनोलेक्स कंपनीचे श्री.तातुगडे साहेब यांच्याहस्ते शाळेच्या आवारात वृक्ष लागवड करण्यांत आली.तसेच गणपती विसर्जनाच्यावेळी निर्मालय विल्हेवाट योग्यप्रकारे करण्याच्य संदर्भात तसेच दिवाळीच्यावेळी फटाके कमी वाजवून ध्वनी प्रदूषण कमी करण्याबाबत श्री.रहाटे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तसेच जिल्हाधिकारी श्री.यादव साहेब यांनी योजिलेली स्वच्छ सुंदर गाव या उपक्रमांतर्गत समुद्र किनारी हरित सेनेचे विद्यार्थ्यांनी जाऊन स्वच्छता केली. मराठी विज्ञान साहित्य परिषदेच्यातंर्गत यावर्षी स्पर्धा घेण्यांत आल्या.त्यामध्ये कु.सुयश सावंत याने वृक्ष संगोपन,संवर्धन व उपयोग यासंदर्भात प्रकल्प सादर केला.यामध्ये त्याने राज्यस्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त झाला. याला श्री.राजन रहाटे सरांनी मार्गदर्शन केले.हरितसेना विभागाचे काम श्री.रहाटे सर पाहतात.

**संगणक विभाग**

प्रशालेमध्ये प्रशस्त असा संगणक कक्ष आहे. यामध्ये २० संगणक असून इयत्ता १ली ते १० वी पर्यंत विद्यार्थी शिक्षण घेत असतात.यावर्षिपासून इ.९ वी व १० वीच्या ICTच्या सर्वविद्यार्थ्यांना इंटरनेटद्वारे शिक्षण दिले जात आहे.तसेच संगणक सामान्यज्ञान स्पर्धा इ.९ वी व ७ वी साठी धेतली जाते.हेकाम सौ.शेवडे व श्रीम.पिलणकर पाहातात.

**भारत स्काऊट /गाईड विभाग**

आपल्या रा.भा.शिर्के प्रशालेत भारत स्काऊट आणि गाईड हे पथक चालते.प्रशालेत एकूण १२ पथके चालू आहेत.या पथकाना स्काऊट श्री देवळेकर सर, श्री.आयरे सर, श्री.चव्हाण सर,श्री.पडवेकर सर,श्री.माळगे सर,श्री.जाधव सर तसेच गाईड सौ.बागवे मॅडम,सौ.साखळकर मॅडम,सौ.पवार मॅडम,सौ.कोळपे मॅडम,सौ.दुदगीकर मॅडमस्काऊट गाईड हे पथक वर्षभर वेगवेगळया उपक्रमात सहभागी होते.उदा.खरी कमाई जिल्हा मेहावा ,राज्य मेहावा,राज्यपुरस्कार.तसेच शाळेमध्ये गाईड पथक रक्षाबंधन उत्सवही साजरा करते.यावर्षी रिमांडहोम या ठिकाणी जाऊन तेथिल विद्यार्थ्यांना राख्या बांधण्यात आल्या.

उल्लेखनीय बाब म्हणजे यावर्षीस्काऊटचे ८विद्यार्थी हे राज्यपुरस्कार प्राप्त झाले आहेत.त्यपैकी कुमार-प्रथमेश विनायक गार्डी यांचे मुंबई येथे राज्यपालांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.या स्काऊटना श्री.आयरे एस.वाय.सरांनी मार्गदर्शन केले.यावर्षी पुनहा ८ विद्यार्थी राज्यपुरस्कार स्पर्धेस बसले आहेत.वर्षभराचे कामकाज पाहाता स्काऊट/गाईडचा आलेख नेहमीच चढता राहीला आहे.

राज्यपुरस्कार प्राप्त स्काऊट विद्यार्थी-१)सुधांशू संजय पालांडे २)प्रथमेश विनायक गार्डी ३)नजीब मुनीर मुलाणी ३)प्रेमजित प्रदिप रणनवरे ४)सुमित सुधीर बागवे ५)प्रणव त्रिविक्रम वेंगुर्लेकर ६)सौरभ संजिल मेहता.

**गरीब विद्यार्थी निधी**

प्रशालेतील गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना आर्थिक आणि शालोपयोगी साहित्य देऊन हातभार लावणेहा या योजनेमागील हेतु असून त्यामुळे विद्यार्थी गुणवत्ता सुधारण्यासाठी अधिक उद्युक्त होतात असा अनुभवही आहे.

यावर्षी३७ विद्यार्थ्यांना वहया, २७विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क, २ विद्यार्थ्याला एस.टी.पास व१३ विद्यार्थ्यांना गणवेश यांचे वितरण करण्यांत आले.अजूनही काही विद्यार्थ्यौना गरजेनुसार मदत देण्यात येणार आहे. आजी व माजी विद्यार्थी व शिक्षक स्वतःच्या वाढदिवसानिमित्त देणगी देतात त्यातून ही मदत दिली जाते हे कौतुकास्पद आहे.या योजनेचे प्रमुख म्हणून श्री.देवळेकर सर काम पाहतात. मा. मुख्याध्यापक,उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षकांचे मार्गदर्शन मिळते.

**पालक शिक्षक संघ**

पालक शिक्षक संघाचे कामही अतिशय सक्रिय असून सर्व पालकांची सर्वसाधारण सभा,वर्गवार पालक सभा व कार्यकारिणीची सभा आयोजित करण्यांत आल्या.सर्वप्रकारच्या सभांना उत्स्फूर्त उपस्थिती ठेवून आणि सविस्तर मनमोकळी चर्चा करुन विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने अनेक चांगले निर्णय घेण्यास पालकांनी सहकार्य केले.

१. रंजन मंदिर मध्ये फायबर खुर्च्यांची खरेदी.
२. विविध स्पर्धेत सहभागी होणाया व राज्यस्तर,राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाया खेळाडूसाठी क्रिडासाहित्य ड्रेस ,प्रवास भाडे यासाठी लागणारा निधी.
३. शालेय ग्रंथालयास आवश्यक असणारी पुस्तके घेण्यासाठी निधी.
४. वर्गवार लागणाया सुविधा-या सर्वासाठी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्याचे महत्वाचे कार्य पालक-शिक्षक संघातर्फे केले जाते.या सर्वच पालक-शिक्षक बांधवांचे मनःपूर्वक आभार !

या विभागाचे अध्यक्ष म्हणून प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. एस.एम. कांबळे सर व सचिव म्हणून श्री.सी.एस.पाटील सर काम पाहतात.

**कु. तेजस दत्तात्रय साखळकर**

**१. गुरुकुल प्रतिष्ठान ,जळगांवआयोजित प्री.एम.टी.एस. परीक्षा (७ वी) - राज्यात प्रथम**
रु. १०,०००/- + चषक (सन्मानचिन्ह ) + प्रमाणपत्र
**२. माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा ( ७वी ) - राज्यात प्रथम ३०० पैकी २९० गुण**
**३. आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाड ( ७वी ) - राज्यात २ रा - आंतरराष्ट्रीय क्र. १४ वा.**
रु.२,५००/- + रौप्यपदक + CD

४. **MKCL तर्फे महाराष्ट्र ऑलिंपियाड परीक्षा ( ७वी) - राज्यात ८ वा**
रौप्यपदक +पुस्तके + मासिक सृष्टिज्ञानचे अंक + मा. शैक्षणिक संदर्भ चे अंक
५. **जिल्हास्तरीय शालेय बॅडमिंटन स्पर्धा- १४ वर्षाखालील गट**
विजयी व विभागासाठी निवड
६. **जिल्हास्तरीय शालेय बुध्दिबळ स्पर्धा - १४ वर्षाखालील गट - द्वितीय**
**विभागीय शालेय बुध्दिबळ स्पर्धा - १४ वर्षाखालील गट - द्वितीय**
**राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड.**
७. **आर.बी .सप्रे स्मृती खुली बुध्दिबळस्पर्धा-जिल्हास्तरीय-२ रा क्रमांक** रु.१०००/- +चषक
८. **चेसमन तर्फे जिल्हासतरीय बुध्दिबळस्पधा १२ वर्षाखालील प्रथम** रु.५००/- +प्रमाणपत्र
९. **जिल्हास्तरीय बॅडमिंटन असोसिएशन आयोजित जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा- १४ वर्षाखालील गट-प्रथम**
१०. **रत्नागिरी सिटी बॅडमिंटन असोसिएशन आयोजित जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा -प्रथम**
११. **महाराष्ट्रगणित संबोध प्रथम (इ.८ वी)**
**गणित प्राविण्य स्पर्धा परीक्षेतून गणित प्रज्ञा परीक्षेसाठी निवड** (इ.८ वी)
१२. **र.ए.सोसायटी तर्फे १५ आध्याय पांठातर - प्रथम**
१३. **लो.टिळक पुण्यतिथी निमित्य आयोजित १५ आध्याय पांठातर - द्वितीय**
१४. **शालेय गणित छंद मंडळ आयोजित -सूत्रे पाठांतर स्पर्धा -प्रथम**

**विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारा शिक्षकवृंद**

१. **श्री. एन.टी. देवळेकर सर**

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत इ.९वी(मराठी)विद्यार्थ्यांसाठी **विद्यार्थी मित्र** व शिक्षकांसाठी मार्गदर्शन पुस्तिका निर्मिती -संपादन समिती सदस्य व राज्यस्तरीय शिक्षक प्रशिक्षणास तज्ज्ञ मार्गदर्शन व बॅच समन्वयक म्हणून यशस्वी कामगिरी.

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत इ. ९वी व १०वी शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका(मराठी) निर्मिती संपादन सदस्य म्हणून निवड.

राज्यस्तरीय मराठी अध्यापक कृतिसत्रात(कल्याण) गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी स्वायत्त,स्वतंत्र शिक्षणप्रणाली -काळाची गरज या विषयावर शोध निबंध सादर.

म.रा. पाठ्यपुस्तक निर्मिती -संशोधन व प्रशिक्षण मंडळातर्फे आयोजित शिक्षकांसाठी पुनर्रचित अभ्यासक्रम इ.१०वी मराठी राज्य विभाग व जिल्हास्तरीय तज्ज्ञ मार्गदर्शक.

दै.तरुण भारत मधून दर रविवारी श्री.गुरवेनम : या सदरात जुन्या पिढीतील नामवंत शिक्षकांच्या कार्यासंबंधी चरित्रात्मक लेखमाला सुरु.

अनेक नियतकालिकांमधून लेख प्रसिध्द.

विविध विषयांवर शाळांमध्ये व्याख्याने संपन्न.

या शाळेत मुख्याध्यापक,उपमुख्याध्यापक,पर्यवेक्षक मिळून **४०** शिक्षक व **१२** शिक्षकेतर कर्मचारी आहेत. या शाळेची विद्यार्थी संख्या **१५३७**एवढी आहे.